

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी 'वारणा'चे माजी विद्यार्थी डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम. शेजारी प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर आदी.

# कुलगुरू डॉ. शिर्के यांचा सत्कार

**वारणानगर :** येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. डी. टी. शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर) यांच्यातर्फे आणि संस्था संचालित विविध प्राचार्यांच्या उपस्थितीत प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, तात्यासाहेब कोरे अभियांत्रीकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. आणेकर, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोजा, शोभाताई कोरे कन्या महाविद्यालय येलूरचे समन्वयक प्रा. एस. आर. कुलकर्णी उपस्थित होते.

# वाचन संस्कृतीचा विकास महत्त्वाचा : राजन गवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** माणूस म्हणून स्वतःच्या जाणिवा सजग व प्रगल्भ होण्यासाठी वाचन संस्कृतीचे विकसन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'मराठी वाचन संस्कृती' या विषयावर ई-चर्चासत्रामध्ये बीजभाषक म्हणून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. आपल्या विविध शैक्षणिक धोरणांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा अपवाद वगळता वाचनाला केंद्रस्थानी फारसे कोणी आणण्याचा प्रयत्न केला नाही. वाचक घडविला नाही. प्रकट वाचन आणि मनन या पलीकडे आपण विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करीत नाही. वाचन याचा अर्थ केवळ ग्रंथवाचन असा मर्यादित घेऊन आपण काम करीत राहतो. तथापि, ग्रंथवाचनाच्या पलीकडे भोवतालाचे वाचन करायला शिकणे, शिकविणे अत्यंत आवश्यक असल्याचे डॉ. गवस यांनी सांगितले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# ऊर्जा मिळविण्यासाठी ग्रंथ वाचन महत्त्वाचे : डॉ. पाटणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवाच्या जीवनात पैसा, वेळ व ऊर्जा या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. यापैकी ऊर्जा ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून ती मिळवण्यासाठी ग्रंथ व त्याचे वाचन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. यशवंत पाटणे (सातारा) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रारंभी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनपटावर आधारित व्हिडीओचे प्रसारण करण्यात आले. प्रा. डॉ. पाटणे यांनी 'वाचन : एक ऊर्जास्रोत' या विषयावर मार्गदर्शन केले. आध्यात्मिक ध्यानधारणा व शांत वाचन जीवनात सुख मिळण्यासाठी महत्त्वाचे असते. जगण्यामध्ये वाचन हे एक प्रभावी माध्यम असून जीवनाची सार्थकता यामुळे प्राप्त होते, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन डॉ. युवराज जाधव यांनी केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.